
सत्यशोधन! समाज प्रबोधन!! राष्ट्र संघटन!!!

RSP राष्ट्रीय समाज पक्ष



राष्ट्र नायक

**मा. महादेव जानकर**

संस्थापक, अध्यक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष

## समृध्द राष्ट्र संपन्न महाराष्ट्र



राष्ट्रीय समाज पक्ष

# संकल्पनामा

विधानसभा निवडणूक-२०२४

सत्यशोधन! समाज प्रबोधन!! राष्ट्र संघटन!!!

राष्ट्रीय समाज पक्ष



# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४

## संकल्पनामा

राष्ट्रीय समाज पक्ष... हा 'उपेक्षित' समाजाला 'अपेक्षित' ठिकाणी घेवून त्यांना न्याय देण्यासाठी अहोरात्र परिश्रम करीत आहे. राष्ट्रनिर्माणासाठी तमाम सर्व समाजाचा, बांधवांप्रती माझी बांधिलकी आहे.

I am not Demander, We are commander मी नेहमी Dedication, Devotion, Determination वा 3D सूत्रावर चालण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. राष्ट्रीय समाजाला संबोधितो की, क्लर्क नको-कलेक्टर व्हा! शिपाई नको - कमिशनर व्हा ! सदस्य नको - आमदार/खासदार व्हा ! स्वाभिमान जागृत करण्याचे स्वप्न राष्ट्रीय समाजाला दाखविले. गेले ३५ वर्ष घर-दार, संसाराचा त्याग करून राष्ट्रीय समाजास जीवन समर्पित केले आहे.

समाजाच्या उद्धारासाठी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत काम करण्याचा मी संकल्प केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्याबाई होळकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, राम मनोहर लोहिया, ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बहुआयामी विचाराने राष्ट्र व राज्याच्या प्रगतीकरिता त्यांच्या आशा-आकांक्षाकरिता समर्पित भावनेने कार्य करीत असताना सर्वसामान्य जनतेचा आशिर्वाद माझ्या पाठीशी भक्कमपणे राहावा व सुशासनासाठी पुन्हा नव्या उमेदीने सत्ता संपादना करीता संकल्प केला आहे.

भविष्यातही राज्यात मोठ्या योजना आणण्याचा माझा संकल्प आहे. ॲग्रो बेस इंडस्ट्री बनवून त्यांना एक्सलंट एक्युकेशन, स्किल डेव्हलपिंग, बँक लोन, एक्सलंट सीड, फिड, फर्टीलायजर, एरीग्रेशन, इलेक्ट्रीसिटी, कोल्ड स्टोअरेज वेअर हाऊसिंग आणि मार्केटिंग या योजना राबविल्यानंतर सामान्य उपेक्षित गाव गड्यातील मुली-मुलगा हा उद्योगपती बनेल. यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाच्या उमेदवारांना आपल्या मतरूपी आशीर्वाद देवून त्यांची विजयाची पताका फडकवा, अशी नम्र विनंती.

जय महाराष्ट्र ! जय भारत !!

आपला,
**महादेव जानकर**
अध्यक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष



राष्ट्र ही देव, राष्ट्र ही जाती, राष्ट्र ही धर्म हमारा
राष्ट्र बने बलशाली, ये भाषासुत्र हमारा...



RSP राष्ट्रीय समाज पक्ष

# संकल्पनामा २०२४

## विधानसभा रासप

## १ संपन्न शेतकरी, समृध्द राज्य

- शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून त्यांना पेरणीपूर्व मशागतीसाठी एकरी 50 हजार रुपये देणार, शेतीमालाला किफायतशिर हमी भाव देणार, जो मागेल त्याला वेअर हाऊस, गोशाळा, कुकुटपालन इत्यादी व्यवसाय देऊन सक्षम करण्यासाठी धोरण राबविणार.
- 2029 पर्यंत राज्याचे सर्व शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी विस्तृत धोरण तयार करण्यात येईल.
- भूमिहीन शेतकरी व शेत मजूरांसाठी बँकेचे कर्ज, सरकारी योजना आणि अन्य सामाजिक सुरक्षा लाभांसाठी सर्व उपयुक्त सोयी सुविधा निर्माण केल्या जातील.
- भूमिहीन शेतकरी आणि शेत मजूरांसाठी गोवंश योजनेखाली त्यांना गाई व अन्य दुधाळ जनावरे उपलब्ध करण्यात येतील.
- राज्यातील पंचायत स्तरावर शेतक-यांना धान्य किंवा शेतातील इतर पिकांचा साठा ठेवण्यासाठी गोदामे आणि कोल्ड स्टोरेज उपलब्ध करण्यात येतील.
- शेतकऱ्यांच्या शेत जमीनींचे परिक्षण करुन सर्व शेतकऱ्यांना 'सॉईल हेल्थ कार्ड' दिला जाईल.
- ५० लाख शेतकऱ्यांना 'ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन योजने' चा लाभ देण्यात वेईल.
- पुढील ५ वर्षात राज्यात दुग्धक्रांती योजना राबविण्यात येणार आणि त्यासाठी दुग्ध विकास निधी उपलब्ध करुन राज्याला दुग्धव्यवसायात देशात प्रथम क्रमांकावर आणण्यात येईल.
- मत्स्यव्यवसायास चालना देण्यासाठी आणि मत्स्यव्यवसायाशी संबंधित रोजगारांसाठी रु. १००० कोटींची तरतूद करण्यात येईल.
- राज्यात 'फुड पार्क राज्य' च्या रुपाने विकासित करण्यात येईल आणि सर्व क्षेत्रांमध्ये 'फूड प्रोसेसिंग पार्क' स्थापन करण्यात येईल व त्याठिकाणी पॅकेर्जीग, निर्यात, रिसर्च या सर्व सुविधा उपलब्ध करण्यात येतील.
- फूड प्रोसेसिंग वर आधारित लघु उद्योग स्थापन करण्यासाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करण्यात येईल.



## २ युवकांना रोजगार, समृध्द राज्य

- उद्योगधंद्यांना चालना देणेसाठी प्रत्येक तालुका स्तरावर MIDC उभारणार, बेरोजगार तरुण-तरुणींसाठी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराभिमुख धोरण राबविणार.
- पुढील ५ वर्षांत राज्यात ५० लक्ष स्वयं रोजगार उपलब्ध करण्यात येतील.
- सर्व प्रत्येक परातील एक शिक्षीत सदस्यांना मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल.
- राज्यात देशातील सर्वात मोठ्या 'स्टार्ट-अप इनक्यूबेटर' स्थापन करण्यात येईल.
- राज्यातील प्रत्येक तालुक्यात आधुनिक कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात येईल आणि त्याठिकाणी आय.टी.. बी.पी.ओ., लॉजिस्टीक्स, पर्यटन अशाप्रकारे कौशल्यावर आधारित मार्गदर्शन केले जाईल.

RSP राष्ट्रीय समाज पक्ष



- राज्यांतील सर्व महाविद्यालयीन मुला/मुलींना कोणताही धर्म व जातीभेद न करता 'स्वामी विवेकानंद इंटरनेट योजने' च्या माध्यमातून मोफत लॅपटॉप व त्यासोबत मोफत इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात येईल.
- राज्यातील प्रत्येक तालुक्यात बेरोजगार मुला/मुलींसाठी 'स्वतंत्र रोजगार मार्गदर्शन कक्ष' उभारण्यात येतील.

## ३ गुणवत्ता पूर्ण शिक्षा, समृध्द राज्य

- "एक देश, एक विधान, सर्वांना शिक्षण एक समान". सर्वांना गुणवत्तापूर्ण मोफत एक समान शिक्षण धोरण राबविणार.
- राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालये वांना मोफत वाय-फाय इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात येईल.
- राज्यातील सर्व प्राथमिक शाळेत योग प्रशिक्षित शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात येतील.
- राज्यात बदलत्या काळाप्रमाणे ज्ञान आणि रोजगारभिमुक अत्याधुनिक शिक्षण धोरण राबविणार.



## ४ सर्वजण सुखाय, समृध्द राज्य

- बेरोजगारांना शाश्वत नोकरी मिळेपर्यंत त्यांना प्रतिमाह 12 हजार रुपये बेरोजगार भत्ता देणार.
- वयोवृध्दांना स्वाभिमान पूर्वक राहण्यासाठी प्रतिमाह 6 हजार रुपये सम्मानश्री योजना राबविणार.
- राज्यातील सर्व गोर गरिब कुटुंबांना जात, धर्म भेदभाव न करता शासकीय योजनांचा पारदर्शकपणे लाभ मिळण्यासाठी 'संत सेवालाल महाराज गरीब कल्याण कार्ड' वाटप करण्यात येतील.
- महिला कामगारांच्या हित व सुरक्षेसाठी राज्य आणि जिल्हा स्तरावर विशेष समितीची स्थापना करण्यात येईल.
- राज्यातील सर्व गोर-गरिब कुटुंबाच्या मुलांना 'कौशल विकास योजनेच्या माध्यमाने' रोजगार प्रशिक्षण देण्याची सोय केली जाईल.

## ५ पायाभूत संरचना विकास समृध्द राज्य

- पाईप लाईनच्या माध्यमातून राज्यातील सर्व घरांमध्ये स्वस्त सुरक्षित गॅस मोफत उपलब्ध करण्यासाठी ''संत जनाबाई मोफत गॅस योजना'' सुरु करण्यात येईल.



- राज्यातील सर्व खेड्यांना मिनी बसच्या माध्यमातून शहरांना जोडण्यात येईल.
- राज्यातील सर्व ग्रामपंचायतींचे आधुनिकीकरण करुन त्याठिकाणी शिक्षणासाठी आवश्यक सर्व दाखले उपलब्ध करण्यात येतील.
- राज्यातील सर्व खेडे गावांपर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण, दळणवळण, आरोग्य इ. सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येतील.

## ६ सर्वसुलभ उद्योग व्यापार समृध्द राज्य

- राज्यातील गुंतवणूकीस चालना देण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण राबविण्यात येईल.
- मुख्यमंत्री कार्यालयाच्या निर्देशनाखाली, उद्योगांसाठी 'सिंगल विंडो क्लीअरन्स विभाग' स्थापन करण्यात येईल.
- राज्यात आरोग्यविषयक अतिमहत्वाच्या विदेशी औषधांचा पुरवठा व उपलब्धता जलद होण्याकरिता फार्मा पार्कची स्थापना करण्यात येईल.
- राज्यात 'महात्मा फुले श्रम सन्मान योजने' च्या माध्यमातून बाराबलुतेदारांना (मोची, शिंपी, सुतार, लोहार, कुंभार, हलवाई, गवंडी अशा प्रकारे) आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देवून त्यांना पारंपारीक रोजगारांसाठी बीनव्याजी कर्ज, आवश्यक साधन सामग्री, बाजारपेठ व दळणवळात्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येतील व वासाठी रु. १००० करोड निधी उपलब्ध करण्यात येईल.
- राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रसिध्द असलेल्या स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करण्यात येईल.
- हस्तशिल्प कारागीरांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यातील ६ विभागांमध्ये हस्तशिल्प केंद्रस्थापन करुन हस्तशिल्पाशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देवून रोजगारक्षम बनविण्यात येईल व त्यांच्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करण्यात येईल.





## ७ सदृढ कुटुंब समृध्द राज्य

- राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ठिकाणी आधुनिक सुविधायुक्त 'प्राथमिक उप-आरोग्य केंद्र' स्थापन करण्यात येवून त्यामध्ये 'आधुनिक प्रसव कक्ष' तयार करण्यात येईल.
- राज्यातील प्रत्येक 'प्राथमिक उप-आरोग्य केंद्रा' च्या ठिकाणी आरोग्याशी संबंधित सर्व आजारावरील सुपर स्पेशालिस्ट वैद्यकीय अधिकारी आठवड्यातून एकदा बाह्यरुग्ण तपासणीसाठी उपलब्ध करण्यात येईल.
- राज्यातील ६ महसूल विभागाच्या ठिकाणी ऑल इंडिया इंस्टीट्यूट ऑफ मेडिकल सायन्स स्तरावरील संस्था स्थापन करण्यात येईल.
- पुढील ५ वर्षात राज्य कुपोषण मुक्त करण्यासाठी 'शबरी संकल्प अभियान' राबविण्यात येईल.



## ८ सामाजिक समता, समृध्द राज्य

- सर्व समाजाची जातनिहाय जनगणना करून समतामुलक समाज निर्माण करणारे धोरण राबविणार.
- लोकसंख्येसोबतच जनतेला मिळणाऱ्या सोयीसुविधा, राहणीमान यातून अधोरेखीत होत असते की. विकासाच्या प्रक्रियेत जे लोक नाहीत, त्यांना या प्रक्रियेत आणणं हे देशाच्या सरकारचं काम असतं. जनतेच्या कल्याणासाठीच्या कोणत्याही योजना आखायच्या असतील त्याच्यासाठीची धोरणं ठरवायची असतील तर मुळात या योजना कोणाला द्यायच्या आहेत याच्यासाठी एक संख्याशास्त्र, माहिती देशाच्या सरकारकडे असणं आवश्यक असतं. म्हणून जात निहाय जनगणना महत्त्वाची आहे.
- हा देश जाती व्यवस्थेने बनलेला देश आहे, हा फक्त धार्मिक देश नाही, पण व्यक्तीची प्रतिष्ठा, तिचं स्थान, तिला कोणतं काम मिळणार वा मिळणार नाही, तिला विकासाच्या कोणत्या संधी मिळणार वा मिळणार नाही या सर्व गोष्टींवर जातीतल्या त्याच्या स्थानाचा प्रभाव पडतो. जात हे या समाजाचं वास्तव आहे. म्हणून जनगणना करताना ती जातीनिहाय केली पाहिजे. म्हणजे कोणत्या जाती विकासापासून दूर फेकल्या गेलेल्या आहेत हे लक्षात येईल. त्यांना योग्य न्याय देणारे धोरण राबविणार.





## ९ सक्षम महिला, समृध्द राज्य

- महिलांना त्यांच्या लोकसंख्येनुसार प्रत्येक क्षेत्रात समान वाटा मिळणारे धोरण राबविणार.
- उच्च पातळीवरील लैंगिक समानता असलेले देश मजबूत आर्थिक वाढ अनुभवतात, याचे कारण असे की जेव्हा स्त्रियांना शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगाराच्या संधींमध्ये समान प्रवेश असतो तेव्हा त्या अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देतात, ज्यामुळे उत्पादकता आणि नवकल्पना वाढते.
- शाश्वत पद्धतींमध्ये, विशेषतः ग्रामीण समुदायांमध्ये स्त्रिया अनेकदा आघाडीवर असतात. ते कृषी, संसाधन व्यवस्थापन आणि घरगुती निर्णय घेण्यामध्ये खोलवर गुंतलेले आहेत. या क्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण अधिक जबाबदार आणि शाश्वत उपभोग आणि उत्पादन पद्धती बनवते.
- जेव्हा स्त्रिया सक्षम होतात, तेव्हा त्या त्यांच्या स्वतःच्या आरोग्याबद्दल आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याविषयी गंभीर निर्णय घेतात. यामुळे मुलांसाठी चांगले आरोग्य परिणाम होतात, माता मृत्यू दर कमी होतो आणि शिक्षणात सुधारणा होते.